वाचले:-१) शासन राजपत्र ५ जानेवारी, २०१७

२) शासन राजपत्र १५ एप्रिल, २०१७

३) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४२ व अन्वये

४) सहाय्यक संचालक नगररचना विभाग नाशिक महानगरपालिका नाशिक यांचेकडील पत्र क्र. मनपा/ननिवि/वशि/९६६/२०१८ दि. १४/८/२०१८

५) अर्जदार श्री. कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार श्री निलेश मधुकर जाधव व इतर एक, रा. १, स्पेस व्हायझर, पाटील लेन नं ०४, कॉलेज रोड, नाशिक, ता.जि.नाशिक यांचा दि.१३/८/२०१८ रोजीचा अर्ज.

६) अर्जदार यांचे दि.१८/८/२०१८ रोजीचे प्रतिज्ञापत्र / शपथपत्र

COLLECTOR OF NASHIK

जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक
क्र. मशा/कक्ष/३/२/रु.क.आ./एस आर/२९०/२०१८
नाशिक दि.१४/०९/२०१८

**आदेश**

अर्जदार **श्री. कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार श्री निलेश मधुकर जाधव व इतर एक**, रा. १, स्पेस व्हायझर, पाटील लेन नं ०४, कॉलेज रोड, नाशिक, ता.जि.नाशिक, यांनी **मौजे चुंचाळे** ता.जि. नाशिक येथील **स.न/ग.नं. ११४ पै,** चे ७/१२ नुसार एकुण क्षेत्र १४०००.०० चौ.मी. पैकी अर्जदार यांचे **क्षेत्र ७०००.०० चौ.मी.** यांस **रहिवास** प्रयोजनार्थ वापरात बदल करणेबाबत विनंती केली आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्राच्या अनुषंगाने या कार्यालयाचे **दि. ७/०९/२०१८** अन्वये **रहिवास** प्रयोजनासाठी अकृषिक सारा व रुपांतरीत कर भरणा करणेबाबत कळविले असता त्यांनी निवासी प्रयोजनार्थ अकृषिक सारा र.रु. ९,२४०/- + रुपांतरीत कर र.रु.४६,२००/- अशी एकूण रक्कम रु. **५५,४४०/- दि. ११/०९/२०१८** रोजी **००२९११७३७०१** या लेखाशिर्षाखाली भरणा करुन डिफेस चलनाची प्रत सादर केली आहे.

उपोद्घातातील वाचले क्र.४ अन्वये सहाय्यक संचालक नगररचना विभाग नाशिक महानगरपालिका नाशिक यांनी सदर मिळकतीस निवासी प्रयोजनार्थ शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम , १९६६ चे कलम ४२ व अन्वये **मौजे चुंचाळे** ता.जि. नाशिक येथील **स.न/ग.नं. ११४ पै,** चे ७/१२ नुसार एकुण क्षेत्र १४०००.०० चौ.मी. पैकी अर्जदार यांचे **क्षेत्र ७०००.०० चौ.मी.** (अक्षरी सात हजार चौ.मी.) **यांस रहिवास प्रयोजनार्थ खालील अटी व शर्तीवर चलन मंजुरीची परवानगी देण्यात येत आहे.**

**१) अर्जदार यांनी नियोजन प्राधिकरणाच्या नियमानुसार आवश्यक त्या परवानग्या घेणे बंधनकारक राहील. तसेच सहाय्यक संचालक / कार्यकारी अभियंता नगर रचना यांनी मंजुर केलेल्या अभिन्यांसातील खुली जागा (Open Space) तसेच रस्ते स्थानिक प्राधिकरणाकडे वर्ग करणे आवश्यक राहील.**

**२) सदर मिळकतीबाबत कोणताही वाद अथवा प्रलंबित असल्यास, तसेच मिळकतीबाबत भविष्यात वाद उपस्थित झाल्यास, त्यास भोगवटदार (मालक) सर्वस्व जबाबदार राहील. त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. व सदर अकृषिक रुपांतरण आदेश रद्द होणेस पात्र राहील.**

**३) सदर मिळकतीबाबत भविष्यात सदर जमिन भोगवटदार वर्ग २/ न.अ.श., न. श. , ना.ज.क.म., देवस्थान इनाम, व इतर कोणत्याही नियंत्रित सत्ता प्रकाराची असल्यास तसेच शासनास अधिभार देय असल्यास सक्षम प्राधिका-याची परवानगी घेणे तसेच त्या वेळीच्या शासनाच्या प्रचलित नियमानुसार शासनास देय होणारा नजराणा / इतर रकमां भरणेची जबाबदारी भोगवटदार (मालक) यांची राहील.**

**४) सदरचा आदेश अर्जदार यांचा चालु ७/१२ व त्या अनुषंगिक कागदपत्रे तसेच करारनामा / प्रतिज्ञापत्राच्या अधिन राहून दिलेला आहे.**

**५) प्रश्नांकित मिळकतीच्या इतर हक्कांत कोणतेही वित्तीय बोजे असल्यास त्यास अधिन राहुन सदरचे चलन मंजुर केले आहे.**

**६) सदरचे आदेश हे अर्ज मिळकतीच्या फ़क्त अकृषिक सारा व रुपांतरीत कर आकारणीबाबत लागु आहेत. सदरचे आदेशाने अर्ज मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तांतरण अथवा मालकी हक्क ठरविला जात नाही.**

**७) अर्ज मिळकतीच्या मालकी अथवा हस्तांतरण हक्काबाबत कोणत्याही न्यायालयात कोणत्याही प्रकारचे वाद प्रलंबित असल्यास सदर प्रलंबित न्यायालयीन प्रकरणात संबंधीत न्यायालय यांचे होणारे सर्व आदेश अर्ज मिळकतीच्या हस्तांतरण व मालकी हक्कावर बंधनकारक राहतील व अर्ज मिळकतीच्या हस्तांतरणासाठी संबंधीत न्यायालय यांची परवानगी घेणे भोगवटदार (मालक) यांना बंधनकारक राहील.**

Scanned by CamScanner